पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४
मा. ह प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. – ०५
सभावृत्तांत

दिनांक –०३/०२/२०२२ दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडे | - | सदस्य |
| ३) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ४) मा. संतोष बबन कांबळे | - | सदस्या |
| ५) मा. चौगुले सिमा दत्तात्रय | - | सदस्य |
| ६) मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| ७) मा. मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्री.विजयकुमार थोरात,क्षेत्रिय अधिकारी ह प्रभाग , श्री.सुपे ए.के. – लेखाधिकारी, श्री.दिलीप धुमाळ, विद्युत विभाग, श्री.विजयसिंह भोसले उपअभियंता स्थापत्य, श्री .संतोष दुर्गे, उप अभियंता, श्री.महेश एन.आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री. चंद्रकांत आ.मोरे, उप.अभियंता पाणीपुरवठा/ स्मार्टसिटी, श्री. दांगडे एस.डी. उप अभियंता, स्थापत्य, श्री. गुजर जयकुमार उप अभियंता स्थापत्य, श्री.सगर पी.व्ही.एपअभियंता पाणी पुरवठा, .मंजरी शामसुंदर परस्मार, क अभियंता, श्री. सन्मान भोसले, क. अभियंता पाणी पुरवठा, श्री. भंडारी एस.पी. क.अ.पाणी पुरवठा,श्री.दिपक कोटीयाना,आ.नि.पशुवैदयकीय, श्री.प्रमोद रामकृष्ण निकम, सहा.सुरक्षा अधिकारी,श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री. सचिन मच्छिंद्र मगर, क.अभियंता स्थापत्य,श्री.दिग्विजय पवार, क अभियंता, पाणी पुरवठा, शाम गर्जे, क.अ.पाणी पुरवठा, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.शेषराज कवडे, सहा.उदयान अधिकारी, श्री. आर. रोकडे, मुख्य अरोग्य निरीक्षक, श्रीम.जयश्री.साळवे, क्रिडा पर्यवेक्षक, श्री.सचिन गुजर, क.अभियंता, श्री. अनिल मेगाशेटटी, क.अभियंता, श्री.एस.के.खडाकळर, सुरक्षा नारक्षक,श्री.एन.बी.लांडगे, कार्यालय अधिक्षक,श्री.मधुकर सानप,- उपलेखापाल, श्री.बाबासाहेब राठोढ, आरोग्य निरीक्षक कचरा वाहतुक, श्री .डी.एम.जगदाळे, आ..प्र.क्र.२०, ,श्री.एस.चौहान,आ.नि.प्र.क्र.३०, श्री.यु.डवरी, आ.नि. प्र.क्र. ३१, श्रीम.आर.जी.तुंडलवार प्र.क्र.३२,

CamScanner

श्री.एस.बी.मानमोडे,आ.नि . किटकनाशक वि भाग, श्री. विजयकुमार तु. उईके, विजपर्यवेक्षक विदयुत, ए.बांदल, विदयुत कासारवाडी, श्री.एम.बी.मानमोडे, किटकनाशक, हे उपस्थित होते

----------

**क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव :** माहे फेब्रुवारी २०२२ च्या दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

----------

**मा. सभापती :** – सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

----------

विषय क्र.१) प्रभाग क्र. ३२ सांगवी येथील रस्ता व पुल यांस नांव देणेबाबत.मा.संतोष बबन कांबळे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

विषय क्र.२ ) प्र.क्र.दापोडी, म.न.पा. शाळेतील मुलांच्या शाळेस स्वर्गीय ज्ञानोब मारुती काटे यांचे नांव देणे बाबत, मा.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दि. ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

विषय क्र. ३ ) प्रभाग क्र. २० मधील चौकास नामकरण करणेबाबत. मा.सुजाता सुनिल पालांडे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक – मा. श्री.माऊली मुरलीधर थोरात

अनुमोदक – मा.श्री.संतोष कांबळे

मा. श्री. माऊली मुरलीधर थोरात - माजी खासदार श्री.गजानन बाबर यांचे दिनांक ०२/०२/२०२२ र दु:खद निधन झाले असल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी त्य दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा. सभापती :** आज दिनांक ०३/०२/२०२२ रोजीची मासिक सभा दिनांक ०८/०२/२०२२ दुपारी १२.०५ वा. पर्यंत तहकूब करण्यात येत.

Aamble

अंबरनाथ चंद्रकांत कांबळे

o/c सभापती, ह प्रभाग समिति,

कासारवाडी – पुणे -३४

CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४
मा. ह प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. – ०५
सभावृत्तांत

दिनांक –०३/०२/२०२२ दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडे | - | सदस्य |
| ३) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ४) मा. संतोष बबन कांबळे | - | सदस्या |
| ५) मा. चौगुले सिमा दत्तात्रय | - | सदस्य |
| ६) मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| ७) मा. मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.क्षेत्रीय अधिकारी श्री.विजयकुमार थोरात,क्षेत्रिय अधिकारी ह प्रभाग , श्री.सुपे ए.के. – लेखाधिकारी, श्री.दिलीप धुमाळ, विद्युत विभाग, श्री.विजयसिंह भोसले उपअभियंता स्थापत्य, श्री .संतोष दुर्गे, उप अभियंता, श्री.महेश एन.आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री. चंद्रकांत आ.मोरे, उप.अभियंता पाणीपुरवठा/ स्मार्टसिटी, श्री. दांगडे एस.डी. उप अभियंता, स्थापत्य, श्री. गुजर जयकुमार उप अभियंता स्थापत्य, श्री.सगर पी.व्ही.एपअभियंता पाणी पुरवठा, श्रीम.मंजरी शामसुंदर परस्मार, क अभियंता, श्री. सन्मान भोसले, क. अभियंता पाणी पुरवठा, श्री. भंडारी एस.पी. क.अ.पाणी पुरवठा,श्री.दिपक कोटीयाना,आ.नि.पशुवैदयकीय, श्री.प्रमोद रामकृष्ण निकम, सहा.सुरक्षा अधिकारी,श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री. सचिन मच्छिंद्र मगर, क.अभियंता स्थापत्य,श्री.दिग्विजय पवार, क अभियंता, पाणी पुरवठा, शाम गर्जे, क.अ.पाणी पुरवठा, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.शेषराज कवडे, सहा.उदयान अधिकारी, श्री. आर. रोकडे, मुख्य अरोग्य निरीक्षक, श्रीम.जयश्री.साळवे, क्रिडा पर्यवेक्षक, श्री.सचिन गुजर, क.अभियंता, श्री. अनिल मेगाशेटटी, क.अभियंता, श्री.एस.के.खडाकळर, सुरक्षा नारक्षक,श्री.एन.बी.लांडगे, कार्यालय अधिक्षक,श्री.मधुकर सानप,- उपलेखापाल, श्री.बाबासाहेब राठोढ, आरोग्य निरीक्षक कचरा वाहतुक, श्री .डी.एम.जगदाळे, आ..प्र.क्र.२०, ,श्री.एस.चौहान,आ.नि.प्र.क्र.३०, श्री.यु.डवरी, आ.नि. प्र.क्र. ३१, श्रीम.आर.जी.तुंडलवार प्र.क्र.३२,

CamScanner

श्री.एस.बी.मानमोडे,आ.नि . किटकनाशक वि भाग, श्री. विजयकुमार तु. उईके, विजपर्यवेक्षक विदयुत, प्रमोद ए.बांदल, विदयुत कासारवाडी, श्री.एम.बी.मानमोडे, किटकनाशक, हे उपस्थित होते

----------

क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : माहे फेब्रुवारी २०२२ च्या दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

-----------

मा. सभापती : – सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

----------

विषय क्र.१) प्रभाग क्र. ३२ सांगवी येथील रस्ता व पुल यांस नांव देणेबाबत.मा.संतोष बबन कांबळे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

विषय क्र.२ ) प्र.क्र.दापोडी, म.न.पा. शाळेतील मुलांच्या शाळेस स्वर्गीय ज्ञानोब मारुती काटे यांचे नांव देणे बाबत, मा.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दि. ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

विषय क्र. ३ ) प्रभाग क्र. २० मधील चौकास नामकरण करणेबाबत. मा.सुजाता सुनिल पालांडे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक – मा. श्री.माऊली मुरलीधर थोरात अनुमोदक – मा.श्री.संतोष कांबळे

मा. श्री. माऊली मुरलीधर थोरात - माजी खासदार श्री.गजानन बाबर यांचे दिनांक ०२/०२/२०२२ रोजी दुःखद निधन झाले असल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी त्यांना दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

मा. सभापती : आज दिनांक ०३/०२/२०२२ रोजीची मासिक सभा दिनांक ०८/०२/२०२२ दुपारी २.०५ वा. पर्यंत तहकूब करण्यात येत.

अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती, ह प्रभाग समिती,
कासारवाडी – पुणे -३४

CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४

मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. – ०५

सभावृत्तांत

दिनांक ०३/०२/२०२२ रोजीची तहकुब सभा

दिनांक –०८/०२/२०२२ दुपारी-१२.०५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ची तहकुब सभा दिनांक ०८/०२/२०२२ रोजी दुपारी १२.०५वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा. चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ३) मा.रोहीत (आप्पा) सुदाम काटे | - | सदस्य |
| ४) मा.संतोष बबन कांबळे | - | सदस्य |
| ५) मा. सोनवणे शारदा हिरेन | - | सदस्या |
| ६) मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |

याशिवाय सभेस मा. थोरात विजयकुमार क्षेत्रीय अधिकारी, श्री.सुपे ए.के.- लेखाधिकरी, श्री.दिलीप धुमाळ – कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.ओंबासे प्रमोद,सह शहर अभियंता, (ऑनलाईन), श्री.संतोष दुर्गे – उपअभियंता विद्युत, श्री.विजयसिंह भोसले- उपअभियंता स्थापत्य, श्री.सुर्यवंशी राजकुमार- उपअभियंता नगररचना, श्री.चंद्रकांत मोरे- उपअभियंता,पाणी पुरवठा. श्री.चंद्रकांत.रोकडे, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.एम.आढाव, सहा.आरोग्य अधिकारी, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.शेवराज कावडे, सहा.उदयान अधिकारी, डॉ.तृप्ती सांगळे,ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी, (ऑनलाईन), डॉ.विजया आंबेडकर, ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी, डॉ.किशोरकुमार हांडे,वैदयकीय अधिकारी,श्रीम.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक, श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव,क.अभियंता स्थापत्य, श्री.मगर सचिन, क.अभियंता स्थापत्य, श्री. विजय कांबळे, क.अभियंता,स्थापत्य, श्री.दिग्विजय पवार, क.अभियंता, पाणी पुरवठा, सन्मान भोसले, क.अभियंता, पाणी पुरवठा, श्री.मंगेशशेटटी, क.अभयंता अतिक्रमण, श्री.मच्छिंद्र कडाळे, उदयान सहाय्यक,श्रीम.डी.एम.जगदाळे, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.२०, श्री.एस.चौहान, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३०, श्री.यु.डवरी, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३१, श्रीम.वैशाली रणपिसे, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३२,श्रीम. ममता सुदाम राठोड, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३२ श्री.बाबासाहेब राठोड, अरोग्य निरीक्षक कचरा वाहतुक, श्री.एम.बी.मानमोडे, किटकनाशक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

----------

CamScanner

प्रभाग
प्रभाग क्र. २०



क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : माहे फेब्रुवारी २०२२ च्या दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचे तहकुब मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

-----------

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक – मा. श्री.माऊली मुरलीधर थोरात अनुमोदक – मा.श्री.सिमा चौधुले

मा. श्री. माऊली मुरलीधर थोरात – भारतरत्न गानसम्राज्ञी कु.लता मंगेशकर यांचे दिनांक ०६/०२/२०२२ रोजी दु:खद निधन झाले असल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी त्यांना दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

मा. सभापती : आज दिनांक ०८/०२/२०२२ रोजीची तहकुब सभा दिनांक १७/०२/२०२२ दुपारी ०२.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

Aumble

अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती, ह प्रभाग समिती,
कासारवाडी – पुणे -३४

CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४
मा. ह प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. – ०५
सभावृत्तांत
दिनांक ०८/०२/२०२२ रोजीची तहकुब सभा

दिनांक –१७/०२/२०२२ दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ची तहकुब सभा दिनांक ०८/०२/२०२२ रोजी दुपारी १२.०५वा. व तहकुब सभा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीची तहकुब सभा दि.१७/०२/२०२२ रोजी ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा. सुलक्षणा राजु धर | - | सदस्य |
| ३) मा.सुजाता सुनिल पालांडे | - | सदस्या |
| ४) मा. आशा धायगुडे – शेडगे | - | सदस्या |
| ५) मा. मा.राजु विश्वनाथ बनसोडे | - | सदस्य |
| ६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्य |
| ८) मा. थोरात ज्ञानेश्वर मुदलीधर | - | स्विकत सदस्या |
| ९) मा. कणसे संजय गुलाब | - | स्विकत सदस्या |

याशिवाय सभेस मा. थोरात विजयकुमार क्षेत्रीय अधिकारी, श्री.सुपे ए.के.- लेखाधिकरी, श्री.दिलीप धुमाळ – कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.ओंबासे प्रमोद,सह शहर अभियंता, (ऑनलाईन), श्री.संतोष दुर्गे – उपअभियंता विद्युत, श्री.विजयसिंह भोसले- उपअभियंता स्थापत्य, श्री.सुर्यवंशी राजकुमार- उपअभियंता नगररचना, श्री.चंद्रकांत मोरे- उपअभियंता,पाणी पुरवठा. श्री.चंद्रकांत.रोकडे, मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.एम.आढाव, सहा.आरोग्य अधिकारी, श्रीम.नम्रता मगर, उदयान अधिकारी, श्री.शेवराज कावडे, सहा.उदयान अधिकारी, डॉ.तृप्ती सांगळे,ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी, (ऑनलाईन), डॉ.विजया आंबेडकर, ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी, डॉ.किशोरकुमार हांडे,वैदयकीय अधिकारी,श्रीम.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक, श्री.महेंद्र देवरे, क.अभियंता,स्थापत्य, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव,क.अभियंता स्थापत्य, श्री.मगर सचिन, क.अभियंता स्थापत्य, श्री. विजय कांबळे, क.अभियंता,स्थापत्य, श्री.दिग्विजय पवार, क.अभियंता, पाणी पुरवठा, सन्मान भोसले, क.अभियंता, पाणी पुरवठा, श्री.मंगेशशेटटी, क.अभयंता अतिक्रमण, श्री.मच्छिंद्र कडाळे, उदयान सहाय्यक,श्रीम.डी.एम.जगदाळे, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.२०, श्री.एस.चौहान, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३०, श्री.यु.डवरी, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३१, श्रीम.वैशाली रणपिसे, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३२,श्रीम. ममता सुदाम राठोड, आरोग्य निरीक्षक प्र.क्र.३२

CamScanner

श्री.बाबासाहेब राठोड, अरोग्य निरीक्षक कचरा वाहतुक, श्री.एम.बी.मानमोडे, किटकनाशक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

----------

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव :** माहे फेब्रुवारी २०२२ च्या दिनांक १७/०२/२०२२ रोजीचे तहकुब मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती :** सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे जानेवारी २०२२ च्या दिनांक १७/०२/२०२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळाली. माहे फेब्रुवारी २०२२ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव :** मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०४ माहे डिसेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

**मा.सभापती -** मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०४ माहे डिसेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

----------

ठराव क्र. -११ विषय क्र. – ०१

दिनांक : १७/०२/२०२२ विभाग : -

सूचक- मा.संतोष बबन कांबळे अनुमोदक - मा.ज्ञानेश्वर थोरात

संदर्भ - प्रभाग क्र. ३२ सांगवी येथील रस्ता व पुल यांस नांव देणेबाबत.मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा. ह प्रभाग समितीच्य मासिक सभा दि. ०५/०८/२०२१ रोजीच्या सभेमध्ये पुढील ठराव सर्वानुमते मान्य झाले आहेत.

१) मा.ह प्रभाग समिती ठराव क्र.३८, विषय क्र.२ अन्वये सदर संगम ऑईल डेपो ते नॅशनल स्कुल कडे स्नेह विहारबिल्डिंग मार्गे जाणा-या रस्ता पर्यन्तच्या रस्त्यास भारतरत्न सेंट मदर टेरेसा असे नामकरण करण्यास मान्यता देण्यत आली आहे. सदरचा विषय मा. महापालिका सभेच्या मंजुरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात यत आहे

२) मा.ह प्रभाग समिती ठराव क्र.३९,विषय क्र.३ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते मुळानगर १८ मीटर डीपी रस्ता पर्यंतच्या रस्त्यास दिवंगत बबन सखाराम कांबळे पथ असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा. महापालिका सभेच्या मंजुरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात यत आहे

३) मा.ह प्रभाग समिती ठराव क्र.४०, विषयक्र.४ अन्वये मौजे दापोडी सांगवी रोड पुलास यापुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुल असे नामकरण झालेले आहे. तद नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना "भारतरत्न" डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुल" असा बदल मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा. महापालिका सभेच्या मंजुरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात यत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

CamScanner

ठराव क्र. -१२

दिनांक : १७/०२/२०२२

विषय क्र. – ०२

विभाग : -

सूचक- मा.सौ.स्वाती(माई) चंद्रकांत काटे

अनुमोदक - मा. राजु बनसोडे

संदर्भ - प्र.क्र.दापोडी, म.न.पा. शाळेतील मुलांच्या शाळेस स्वर्गीय ज्ञानोब मारुती काटे यांचे नांव देणे बाबत, मा.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दि. ०३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित दपोडीतील प्रभाग क्र. ३० मधील हुतात्मा भगतसिंग विदयामंदीर या म.न.पा.शाळेतील मुलांच्या शाळेस "स्वर्गीय ज्ञानोब मारुती काटे" यांचे नांव देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. -१३

दिनांक : १७/०२/२०२२

विषय क्र. – ०५

विभाग : -

सूचक- मा.सुजाता पालांडे

अनुमोदक - मा.माऊली थोरात

संदर्भ - प्रभाग क्र. २० मधील चौकास नामकरण करणेबाबत. मा.सुजाता सुनिल पालांडे यांचे दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचे पत्र.

प्रभाग क्रमोक २० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन (संत तुकाराम नगर) चौकास "दसरा चौक" असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**दिनांक १७/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. झालेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.**

----------

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग –** मागच्या वेळी आम्ही १७८ लोक भरली या वेळेस १४५ लोक मिळाली. त्यामध्ये १०० कर्मचारी पुर्णवेळ आणि ४५ अर्ध वेळ असा आदेश दिलेला आहे.

**मा. सुलक्षणा राजु धर -** १७८ वरुन१४५ कर्मचारी कसे१

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग –** आपल्याकडून सर्व आरोग्य निरीक्षीकांकडून रस्त्यांची माहिती मागवली होती, मागच्या वर्षी ही माहिती दिली.त्या अनुषंगाने त्यांनी तेवढी मॅन पावर आणि यंत्र सामुग्री दिली.

**मा. सुलक्षणा राजु धर –** आहे तिच माणसे पुरत नाही आणि त्यामध्ये तुम्ही का कमी केली१

**मा. आशा धायगुडे – शेडगे –**आढावसाहेब उलटे रस्ते वाढले आहेत.तुमचे रोडसुपर येईल तेव्हा येईल. आता रोडसुपर तुमच्याकडे आहे काय१

**महेश आढाव –** त्यांना रात्रपाळी आहे.

**मा. आशा धायगुडे शेडगे –**ही जी १७८ माणसे आहेत ते तुमची माणसे दयावचे ठरले होते.अधी तुम्ह तुमची माहिती दिली होती का१ काही तरी चुकले माणसे वाढायला हवी आता उलट झाले आहे रस्ते कमी झाले म्हणता रस्ते कमी नाही होत.

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग –** मॅडम मी रस्ते कमी झाले असे नही म्हटले.

**मा. आशा धायगुडे – शेडगे –** रस्त्याच्या आधारे माणसे दिली ना. अधिच्या रस्त्याची माहिती वेगळी आहे का१

CamScanner

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग** – यामध्ये मॅडम आपण यांत्रिकीकरण केले आहे.

**मा. आशा धायगुडे – शेडगे** – यांत्रिकीकरणाची वर्क ऑर्डर दिली का?

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग** –मॅन पावर + यांत्रिकीकरण झाले इ. माणसे

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग** - १४५ + मशीन

**मा.सभापती** - त्या मशीन किती घेणार आढाव अजून सांगितले नाही. आपण पहिली प्रभागाची मिटिंग घेऊन आरोग्याची मीटिंग घेऊ. नागरीक तुमच्याकडे नाही येणार. ते आमच्या आमच्याकडे येतात. एक तर आता इलेक्शन आले आहे.

**मा.राजापुरे माधवी** –वार्डामध्ये साफसफाई पण झाली पाहिजे.

**मा. सुजाता पालांडे** - कॉन्ट्रक्टरला चार्ज दिला ना कालपासुन, त्यांनी जे बोलले ते सुरू व्हायला पाहिजे. दुसरी गोष्ट चेअरमन साहेब त्यांच्याकडे जी लोक कामाला आहेत त्यातील ब-याशा बायका खूप जास्त वयाच्या आहेत. ज्यांना होतच नाही त्यांना जागा कोणी दिली.

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग** - मी त्यांचे समर्थन करीत नाही पण दोन मुद्दे आहेत त्यांच्याकडून काम होत नाही आणि प्लस एस पी आय चे लोक झाडतात पेमेंट मिळेल त्यांना.

**मा. सुलक्षणा धर** - आताच्या बायका काढल्या त्या तरूण होत्या ना. काढल्या विषय नाही मी म्हणत.

**मा.सभापती** - प्रभागांमध्ये चार नगरसेवक असतील त्यांची पहिली तुम्ही मीटिंग घ्यायला पाहिजे होती. आपल्या मिटींग कमी असतात पण मी मिटिंग झाल्यानंतर सगळयांना मॅसेज करणार आहे तुम्ही उद्याच्या उद्या तुम्ही चारही प्रभागातल्या नगरसेवकांना भेटा सर्वांना एकत्र बोलवा.

**मा. आशा धायगुडे – शेडगे** - या कार्पोरेशन मध्ये काय चालले आहे ते कळत नाही. माझ्याकडे रात्री साडेदहा वाजता काही महिला आल्या व म्हणाल्या की, आम्हाला कामावरून काढले. मी विचारले त्यांना कुठल्या ताई तुम्ही तर त्यातल्या कुणी दापोडीच्या तर कुणी फुगेवाडीच्या तर तुम्ही आम्हाला बोलून सांगितले नाही की टेंडर निघणार आहे. असे होणार आहे. आम्हाला काहीतरी कल्पना असायला पाहिजे. स्थापत्य विभागाशी आमचे क्वोर्डनेशन असते. आरोग्याचे का होत नाही. त्यांना कामावरुन काढा असे आम्ही म्हणत नाही. परंतु वयस्कर बायका असतात त्यांना आम्ही काही बोलू शकत नाही. त्यांनी कामाबद्दल काही विचारले तर म्हणतात आज खूप काम होते म्हणून आमचे कंबरडे गेले त्यांना मी काही म्हणू सुद्धा शकत नाही. असे ती बाई आम्हाला तोंडावर सांगते आणि ते स्वीकारण्याशिवाय आम्हाला पर्याय नसतो. मी माझ्या वॉर्डातील महिलांना विचारते माझे काम कसे आहे. माझे काय चुकले का? माझे काही राहिले का? तर सर्व महिलांची एकच तक्रार आहे. "कचरा" त्याबद्दल मी आढाव साहेबांन बरोबर तीन मीटिंग घेतल्या. तुम्ही तुमच्या हिशोबाने माणसे कामाला घेता. साहेब तुम्हाला सांगते येथे एक नियोजन असले पाहिजे. माझ्या वार्डात दोनच गाड्या आहेत. जर गाड्या सहीत टेंडर घेतले असेल तर गाडया पाहिजेत, नाहीतर तुमची १७८ माणसे पाहिजेत. तुम्ही म्हणाल दंड करतो हे सोलुशन नाही त्यावर. माझी अडचण माझी समस्या जागेवर राहिली. त्याचे पैसे कट व्हावेत त्यांना प्रॉफिट कमी व्हावा हे नाही पाहिजे आम्हाला. काम झाले पाहिजे. सर्व रोड, रस्ते खराब आहे. पाणी नाही एकही तक्रार नाही फक्त कचऱ्याच्या गाडया. एकच समस्या कचऱ्याची. आम्हाला आमच्या वॉर्डात टेंडर निघाले याची कल्पना द्या. आज त्यांची माणसे कामावर का नाही आली. आता मला कळाले माणसाबरोबर गाड्या पण दिल्यात.

**मा सभापती** - आज आमच्या ताईंनी सांगितले, सगळया नगरसेवकांना हाच प्रश्न मांडला. आम्ही आता म्हटलं तर आम्ही आयुक्तानापण अडवू लावु शकतो एक पत्र देऊन. हे टेंडर तुम्ही काढले, तुम्ही हे टेंडर खाली पाठवले. ताई बोलल्याप्रमाणे गाड्या का नाहीत. मी ते टेंडर वाचले ते आपल्या अधिकाऱ्यांना पण आले. त्या टेंडर मध्ये काय काय कामे आहे.

**मा. आशा धायगुडे – शेडगे** - सगळयात जास्त खर्च आपण कचऱ्यावर करतो.

**मा.स्वाती (माई) काटे** - सगळे ते कचराकुंड्या उचलल्यामुळे प्रॉब्लेम व्हायला लागले आहे. कचराकुंड्या उचल्या तरी लोक तेथे कचरा आणून टाकत आहे. सकाळी कचरा उचल्या नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी कचरा उचलतात. त्यामुळे लोक कचराकुंडीच्या जागी कचरा टाकतात एवढी बेकार परिस्थिती आहे. तो त्यांचा कचरा शेजारी चाळ आहे त्या चाळीत प्लास्टिक पिशव्या आणून टाकतात. उलट आता जास्त कचऱ्याचा वापर व्हायला लागला आहे साहेब.

**मा. सुलक्षणा धर** - माझी वसुंधराची पण लोक आली होती. त्यांच्यामध्ये पण दोन-दोन एजन्सी आहेत. त्या दोन एजन्सी कशासाठी. बेसिक पण तेच सांगतात ओला-सुका कचरा वेगळा करा.

CamScanner

आम्हाला आमच्या वॉर्डात टेंडर निघाले याची कल्पना द्या. आज त्यांची माणसे कामावर का नाही आली. आता मला कळाले माणसाबरोबर गाड्या पण दिल्यात.

**मा सभापती** - आज आमच्या ताईंनी सांगितले, सगळ्या नगरसेवकांना हाच प्रश्न मांडला. आम्ही आता म्हटलं तर आम्ही आयुक्तानापण अडवू लावु शकतो एक पत्र देऊन. हे टेंडर तुम्ही काढले, तुम्ही हे टेंडर खाली पाठवले. ताई बोलल्याप्रमाणे गाड्या का नाहीत. मी ते टेंडर वाचले ते आपल्या अधिकाऱ्यांना पण आले. त्या टेंडर मध्ये काय काय कामे आहे.

मा. आशा धायगुडे – शेडगे - सगळ्यात जास्त खर्च आपण कचऱ्यावर करतो.

मा.स्वाती (माई) काटे - सगळे ते कचराकुंड्या उचलल्यामुळे प्रॉब्लेम व्हायला लागले आहे. कचराकुंड्या उचल्या तरी लोक तेथे कचरा आणून टाकत आहे. सकाळी कचरा उचल्या नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी कचरा उचलतात. त्यामुळे लोक कचराकुंडीच्या जागी कचरा टाकतात एवढी बेकार परिस्थिती आहे. तो त्यांचा कचरा शेजारी चाळ आहे त्या चाळीत प्लास्टिक पिशव्या आणून टाकतात. उलट आता जास्त कचऱ्याचा वापर व्हायला लागला आहे साहेब.

मा. सुलक्षणा धर - माझी वसुंधराची पण लोक आली होती. त्यांच्यामध्ये पण दोन-दोन एजन्सी आहेत. त्या दोन एजन्सी कशासाठी. बेसिक पण तेच सांगतात ओला-सुका कचरा वेगळा करा.

श्रीम.आर.जी. तुंडलकर- आरोग्य निरीक्षक – वसुंधरा ती आहे पर्यावरणाशी निगडित आहे. बेसिक हे जे आहे ते आरोग्य विभागाची आहे.

मा. आशा धायगुडे – शेडगे - एकच टेंडर चार जणांना काढले आहे.

मा.स्वाती (माई) काटे - बेसिकची तरआम्हाला काहीच कल्पना नाही. कोण आहे काय आहे.

मा. सुलक्षणा धर - बेसिकची अर्व्हेनेस सुद्धा नाही झाले अजून तीन महिने झालेत.

**मा. सुजाता पालांडे** - बेसिक येऊन तीन चार महिने झाले. त्या परिस्थितीमध्ये आणि आता किती सुधारणा झाली आहे सांगू शकता का? वर वर नको.

श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग - वरवर नाही सांगत. आकडेवारीसह सांगतो.

**मा. मा.सुजाता पालांडे** - ज्या दिवशी बेसिक आला मी प्रत्येक जेबीला आणि प्रभागाला सुद्धा बोलले फक्त फाईल नाचवतात. त्यावर फक्त तुमच्या सह्या झाले आहेत. कामाचे स्वरूप काय आहे. एजंटला नाही उलट कामाचे दोष आम्ही तुम्हाला देणार आहोत. आता जशी सुलक्षणा ताई म्हणाली वसुंधराचे. थोरात साहेब आमच्याकडे प्रश्न काय येतो की, सोसायटी धारक जे आहेत त्यांच्या मुळातला प्रश्न तर तुम्ही नागरिक म्हणून ओला-सुका कचरा वेगळा घेत आहे तर तुम्ही भेदभाव करत आहे.प्रत्येक सोसायटीला प्रोजेक्ट करणे सोपे नाही आहे. प्रत्येक सोसायटीला पर हेड ७० ते ८० रुपये देणे सोपे नाही. मला एखादा सोसायटी धारक म्हणतो मी तुमचे टॅक्स भरतो. पाणी बिल भरतो. वीज बिल भरतो. मी तुमचे सर्व टॅक्स भरतो वृक्ष व पर्यावरणाचा टॅक्स भरतो मी हा भुर्दंड का सहन करू. त्या सोसायटीचे आम्ही काय करायचे. माझं तुमच्यावर आरोप आहे फक्त आणि फक्त स्वच्छ संर्वेक्षणवाले फाईल घेऊन नाचत आहे.

मा. सुलक्षणा धर - साहेब आजही नाही होत स्वच्छ संर्वेक्षण. आमच्याकडे एकच बिण आहे. आम्ही नाही करत ओला-सुका कचरा वेगळा.

**मा.सुजाता पालांडे** - आढाव साहेब तुम्ही आम्हाला नाहीत दिला दंड. कुठला दुकानदार हॉटेलवाला तुम्हाला ओला व सुका कचरा देतात. साहेब तुम्हीच तुमचे काम वाढून ठेवले आहे. काय गाड्या बेसिक आणि वसुंधराची. साहेब आमच्या खिशातून पैसा जात आहे. आमच्याकडे चार ला फोन असतो ताई ड्रेनेज तुंबले आहे. तुम्ही सकाळी झोपले आहात आणि तुम्हाला असां फोन आला तर किती ईरिटेट

CS CamScanner

व्हाल. साहेब रोज आम्ही जर शंभर फोन कचऱ्यासाठी ड्रेनेजसाठी घेत आहोत तर आम्ही काय बोलणार. आम्ही प्रभागात फक्त पक्षासाठी म्हणुन बसत नाही. आम्ही फक्त आणि फक्त कामासाठी बसतो.

**मा.स्वाती (माई) काटे** - साहेब तुम्ही मशीन आणली त्याला माणसे नाही लागणार का?

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग** – लागणार.

**मा.सभापती** - आढाव साहेब आमचे नशीब चांगले आहे आम्ही तिथे फक्त पक्षासाठी नाही बसत. आम्ही येथे कामासाठी बसत आहे. मी सकाळपासून सांगत आहे अरोग्याची एक मीटिंग घ्या.

**मा.सुजाता पालांडे** - नागरिकांना आपण स्वच्छता देणे ही मूलभूत गरज आहे सर येथे आम्ही जर इलेक्शनच्या पिरीयडला कमी पडलो तर, त्याच्यामुळे आम्ही मागे राहतो ना साहेब. तुम्हाला ही परीक्षा नाही द्यायचे आहे.

**मा सभापती** - थोरात साहेब आम्ही येथे बारा वाजल्यापासून थांबलो आहे आम्हाला लग्न आहे, दाहवा आहे, कार्यक्रम आहे तरी आम्ही येथे बसलो आहे. तुमची कोणती अधिकारी आहे.

**मा.स्वाती (माई) काटे** - अतिक्रमणाचे कोणी आहे का? शिवाजी महाराज पुतळ्याजवळ जी वस्ती आहे. तिथे टॉयलेट वापरतात त्या समोर इतकी घाण करतात. त्या टॉयलेट समोर अक्षरक्ष: तळे साचले आहे. तुम्ही उभे सुद्धा राहू शकणार नाही. सगळ्या रस्त्यावर घाण आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** - हि जी काही नवीन निविदा आरोग्याचे आली आहे. त्याच्यावर चर्चा सुरू आहे. याच्या मध्ये दोन वर्षापूर्वीचे रिपोर्ट आहे १४४ लोक आणि मेकेनाईज पद्धतीने जे काही रस्ते असतील ते साफ करणे. ही निविदा वर्कआउट होऊनही बरेच दिवस झाले होते. त्यामुळे त्यांना प्रत्यक्ष काम करण्यास सांगितले नव्हते. हा जो मुद्दा आहे तो आम्ही कमिशनर साहेब, अड.कमिशनर साहेबांना बोललो होते. स्वच्छ संरक्षण चालू आहे त्यात आपले लोक कमी पडतात. मॅकेनाईज पद्धतीने काम होत नसल्यामुळे ऑलरेडी ३० ते ३५ लोक कमी पडतात. त्यावेळी त्यांना स्पष्ट सांगितले होते की पूर्वी जेवढी लोक आहेत तेवढेच घेण्यासंदर्भात त्यांना उपआयुक्तांकडून सूचना दिल्या होत्या. पण काल त्यांनी अचाणक त्यांनी ३४ लोक कमी केलेली आहेत. आता त्यांच्याशी फोनवर बोलणे झालेले आहे. उद्या कुठल्याही परिस्थितीत आहे ती लोक दया पुढची त्यांची मॅकेनाईज सुरुवात होत नाही तोपर्यंत त्यांना स्पष्ट सूचना दिल्या जातील आणि उद्यापासून आहे त्या लोकांवर काम सुरू होईल.

**मा. आशा धायगुडे – शेडगे** - माझा मूळ प्रश्न तसाच राहिला तुम्ही आम्हाला पूर्व कल्पना का दिली नाही आज तुम्ही बेसिक आणले बेसिक ची माणसे पण ठरली. सगळे काम सुरू झाले आणि आम्हाला कल्पना नाही. आम्ही आमच्यावर प्रभागावर मनापासून प्रेम करतो.

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** - बेसिक किंवा स्वच्छतागृहाची सुरुवात करायच्या वेळी आपण स्पेशली एक मीटिंग अरेंज केली मॅडम आपण प्रेजेनटेशन दिले होते.

**मा.राजापुरे माधवी** -दिले होते पण सगळे नव्हते मिटींगला.

**मा. आशा धायगुडे – शेडगे** - दिलं होतं तर प्रश्नच संपला.

**मा.स्वाती (माई) काटे** - बाहेरच्या बायका इथे कामाला नको आहे साहेब.

**मा.सुजाता पालांडे** - साहेब मिटिंग झाली ठीक आहे. आपण जी स्वच्छाग्रहाच्या अनुषंगाने जी कामे करता आमच्याकडे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक आहे बॅनर लावलेत, आगळ्यावेगळ्या पद्धतीने पाठपुरावा करून सुशोभीकरण केले. आम्ही तक्रारी पण केल्या एवढा सुंदर चौकाचे विद्रुपीकरण झाले आहे त्या फळ्या वगैरे आणून टाकल्या आहेत तिथे सगळे लोक पत्ते खेळत बसतात, आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक आहे तो तुम्ही बसायला वगैरे दिले आहे. तिथे लोक ड्रिंक करतात. थुंकतात.

CamScanner

**मा.क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** - आपला उद्देश चांगला होता आणि ते पंधरा दिवसांसाठी होते.

**मा. सुलक्षणा धर** - मग ते काढून टाका ना.

**मा.सुजाता पालांडे** - जवळजवळ दोन वर्षापूर्वी तिथल्या कारंज्यामध्ये कुत्री, मांजरी बसत होती. आता हया प्रभागांमध्ये ते कारांजे पाडण्याचा ठराव झाला आहे. पण आपल्या जेईला तो ठराव सापडला नाही.

**मा.स्वाती (माई) काटे** - शोधून दयायचे आपले काम आहे ते.

**मा.सुजाता पालांडे** - आमच्या वार्डात काहीच कामे चांगली झाली नाही. आम्ही पुढच्या वार्डात जातो नंबर ९ मध्ये तेथे प्रत्येक भिंती रंगवल्या आहेत. प्रत्येक रस्त्याचे अर्बन डिझाईन केलेली झाडी रंगवलेली आहे जणू काही त्या प्रभागासाठी टेंडर काढले आहे आणि जेव्हा जेव्हा आपण त्याला सांगत होतो तेव्हा आमच्याकडे एकही माणूस काम करून दयायला तयार नाही त्यांना पैसे वेगळे आहे. त्यांच्या तरतुदी वेगळया आहेत का. विद्रुप करण्याचे असेल तर काम करू नका. आमच्या वार्डाला या दोन महिन्यात हात लावू नका आम्ही नागरिकांना सांगू आम्ही बजेट आणू शकलो नाही. आमच्या वर्डात सिमेंट कॉंक्रीट रस्ता तरतूद नसल्यामुळे एक ही रास्ता झाला नाही. स्पीडब्रेकर टाकला नाही. आज आमच्याकडे फायर ब्रिगेड च्या गाड्या जाऊ शकत नाही. काय तर परमिशन नाही. साहेब मी सांगते आपच्याकडे 2 तरी स्पीडब्रेकर पाहिजेत.

**मा.स्वाती (माई) काटे** -स्पिड ब्रेकर टाकण्यासाठी आरटीओची परमिशन लागते म्हणतात.

**मा.सुजाता पालांडे** - ९ नंबर मध्ये बघा किती टाकलेत त्यांनी कुठे परमिशन घेतली. आम्ही आता इलेक्शनला समोर जाणारा आहोते तेव्हा लोक म्हणार तो वार्ड बघा आणि हा बघा. काय करणार आम्ही. आम्ही उत्तर काय देणार. आज माझ्याकडे जिजाऊ सांस्कृतिक भवन आहे तेथे असे सेक्युरिटी ठेवले आहेत. तिथे गांजा सिग्रेट पिणारी मुले बसतात त्यांच्यातच ती लोक बसतात. त्या एजन्सीवर आपला काहीतरी त्रिशूंक आहे ते मला सांगा. त्या पीसीएमसीच्या वस्तू आहेत त्याचे प्रायव्हेटजेशन झाले आहे. एखाद्याच्या हातामध्ये आहेत त्या. तो माणूस सांगतो आम्हाला, जर तुम्हाला हे विरुंगळा केंद्र घ्यायचे असेल तर माझे जेवण घ्यायला लागेल तुम्हाला. नाही तर मी तुम्हाला विरंगुळा केंद्र देणार नाही. मी किती वेळा तरी पत्र दिले आहे तुम्हाला. कि ते विरंगुळा केंद्र काढून घ्या. लोक तुम्हाला नाही आम्हाला विचारतात की वास्तू कॉर्पोरेशची असताना कांबळे साहेबांच्या तब्येत कशी कांबळे साहेब कसे म्हणू शकता जेवण माझे घ्या म्हणून. मला लवकरात लवकर माझी दोन नामकरणाचीनावे आहेत त्यांचे बोर्ड लावण्यात यावे प्रचिकेत काळे ग्रियारोहक होता तो शहीद झाला त्याचे नाव. छत्रपती संभाजी महाराज चौक, विशाल जाधव अग्निशामक चौकाला नाव दिले नाही. लाईट पाणी झाले, रस्ते झाले लोकांना दुसरे काय पाहिजे असते आम्ही कोणत्या टेंडर साठी थांबलो नाही आम्हाला टेंडर द्या म्हणून.

**मा. आशा धायगुडे – शेडगे**- आम्हाला कळतात कोणते टेंडर कोणी घेतले तुम्हाला कसे कळत नाही कसे शक्य आहे दापोडी बॉम्बे कॉलनी मध्ये जिम आहे तिथे जाऊन बघा बरे काय चालले तिथे आम्हाला कळते तुम्हाला तुमच्या अधिकाऱ्यांना कसे नाही कळत. वर हॉल बांधला महिलांना योग करायला पण तेथे काचा फोडल्या दारूच्या बाटल्या पडतात. आम्ही सांगितले सकाळी एक तास ज्येष्ठ नागरिकांना तुमचा एक तास तो हाल द्या ते योगा करतील. चांगल्या लोकांना चांगल्या कामासाठी द्या. तिथे काही झाले तर त्याला कोण जबाबदार. ती वास्तू एखाद्या संस्थेला वापरायला द्यायची. अशा या वास्तू चांगल्या आहेत या नागरिकांच्या हितासाठी वापरल्या गेल्या पाहिजेत. का कोणी बघत नाही.

**मा.सुजाता पालांडे -** थोरात साहेब अग्निशामकचा जो स्पीड ब्रेकरचा विषय आहे तो बघून द्या. त्यांना नेमके कुठे हवे आहेत ते. दोन चार वेळा अक्सीडेंट होऊन एक बाई गेलेली आहे. दोन चार जे आहे ते प्रायव्हेटली करून द्या साहेब ही विनंती करते. आणि विरुगळा केंद्र ताबडतोब ताब्यात द्या.

**मा.स्वाती (माई) काटे** -सांगवी पासून दापोडीतल्या लक्ष्मी चौकापर्यंत स्पिडब्रेकर टाकल्या पाहिजेत शाळा सुटल्यानंतर खूप गर्दी असते.

**मा सभापती** - साहेब आता जे सांगितले आहे ते तुम्ही स्पिडब्रेकर ते बघून द्या जर नसेल तर एकही ठेवू नका सर्व काढून द्या सर्व नगरसेवक प्रभागाच्या मिटींगला येतात पण जे येत नाही त्यांचे काम होतं व जे येतात त्यांची होत नाही असे झाले आहे. विरुंगळा केंद्र ताब्यात द्या. आरोग्याची परत मिटींग द्या.

माहे फेब्रुवारी २०२२ ची दिनांक १७/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेस सर्व सन्मा.सदस्यांचे व सर्व विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मासिक सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करण्यात आले.

(सही)
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती, ह प्रभाग समिती,
कासारवाडी – पुणे -३४

(सही)
क्षेत्रीय अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी –पुणे -३४

क्र.हक्षेका/कावि/२७ /२०२२
दिनांक - २३/०२/२०२२